# <u>प्रेसनोट</u>

**जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/२७३५/२०२४** **पुणे शहर, दिनांक १० /०४/२०२४**

**<u>विषय</u> :- रमजान ईद : २०२४ निमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल करण्याबाबत....**

------००------

दिनांक ११/०४/२०२४ अथवा दिनांक १२/०४/२०२४ रोजी (चंद्र दर्शनानुसार जाहीर केलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर किंवा पुढे) रमजान ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर/ सार्वजनिक ठिकाणी सामुहिक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यावेळी ईदगाहचे जवळपास मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते. त्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, रोहिदास पवार पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर सदर परिसरातील वाहतूकीत अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करीत आहे.

गोळीबार मैदान चौक येथे होणा-या नमाज पठणाच्या कार्यक्रमासाठी दिनांक ११/०४/२०२४ अथवा दिनांक १२/०४/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते नमाज पठण पूर्ण होईपर्यंत सदर ठिकाणी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी आवश्यकते नुसार वाहतूक वळविण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरुन जाणा-या वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

१. गोळीबार मैदान चौकातून स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा नमाजपठणाच्या वेळी बंद राहणार आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>-** गोळीबार चौकातून डाव्याबाजूस वळून सीडीओ चौक पुढे उजवीकडे वळून गिरीधर भवन

चौक पुढे उजवीकडे वळुन सेव्हन लव्हज चौकातुन इच्छित स्थळी जातील.

२.सीडीओ चौक ते गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक नमाज पठण काळात बंद राहणार आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>-** लुल्लानगरकडुन येवुन खाण्या मारुती चौकाकडे जाणारी वाहतुक खटाव बंगला चौक - नेपीयर रोड - मम्मादेवी चौक किंवा वानवडी बाजार चौक - भैरोबानाला येथून किंवा गिरीधर भवन चौकातून इच्छित स्थळी जातील.

३.सेव्हन लव्हज चौक कडून गोळीबार मैदानकडे येणारी वाहतूक बंद राहणार आहे.
**पर्यायी मार्ग-** सॅलेसबरी पार्क - सी.डी.ओ. चौक - भैरोबानाला येथुन इच्छित स्थळी जातील.
४.सोलापूर रोडने मम्मादेवी चौक येथे येणारी वाहतूक ही गोळीबार चौकाकडे जाण्यास बंद राहणार आहे.

**पर्यायी मार्ग-** मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा कमांड हॉस्पीटल मार्गे डाव्हर्शन करुन पुढे इच्छित स्थळी किंवा नेपिअर रोडने पुढे सीडीओ कडे जातील.
५.भैरोबानाला ते गोळीबार मैदानकडे जाणारी वाहतूक भैरोबानाला येथे बंद राहणार आहे.
**पर्यायी मार्ग-** १. भैरोबानाला ते एम्प्रेसगार्डन मार्गे किंवा
2. भैरोबानाला ते लुल्लानगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

6. कोंढवा परीसरातून गोळीबार मैदानाकडे येणा-या सर्व जड मालवाहतुक वाहने, जड प्रवासी बसेस, प्रवासी एस टी बसेस, पीएमटी बसेस यांना प्रवेश बंद राहणार आहे.

**पर्यायी मार्ग-**लुल्लानगर चौकातुन भैरोबानाला चौक किंवा गंगाधाम चौकातुन इच्छित स्थळी जातील.

## कोंढवा वाहतूक विभागांतर्गत करण्यात येणारे बदल खालील प्रमाणे

1. ज्योती हॉटेल चौकातून फकरी हिल्स चौक मार्गे कमेला, साळुंके विहार येथे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक उजवीकडे वळण्यास बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग-** लुल्लानगर चौकातून यु-टर्न करुन कमेला, साळुंके विहार

2. ज्योती हॉटेल चौकातून डावीकडे वळून मेफेअर जंक्शनमार्गे पारगेनगरकडे जाणारी जड वाहतूकीस ज्योती हॉटेलकडून डावीकडे वळण्यास बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग-** सरळ ज्योती हॉटेल चौक, शितल चौक मार्गे पारगेनगर

3. पारगेनगर येथून मेफेअर जंक्शन मार्गे ज्योती हॉटेलकडे जाणारी जड वाहतूक बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग-** पारगेनगर, शितल चौक मार्गे ज्योती हॉटेलकडे

याखेरीज शहरातील अन्य भागातील ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार असल्याने सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी वाहतुक पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.

**(रोहिदास पवार )**

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक

पुणे शहर